# जलवैभव वार्ता

नोव्हेंबर-२०१९ औरंगाबाद, जालना, बुलढाणा

## जलवैभवमधून होणार कायापालट

दिलासा संस्था व एलटीएफएस यांचा मुळ उद्देश पाणी अडविणे व जिरविणे हाच आहे. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेऊन पहिल्यांदा बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील १२ गावांमध्ये पाणलोटाचा यशस्वी कार्यक्रम राबवण्यात आला होता. त्याचा परिणाम लगेच त्याच वर्षी दिसून आला. कायम दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणऱ्या या डोंगराळ गावांमध्ये सरासरी एवढा पाऊस झालेला नसतानाही यावर्षी पाण्याचे दूर्भिक्ष जाणवलेले नाही.धारुर मधील दिलासाचे काम आणि पाणलोट कामांची यशस्वीता पाहता एलटीएफएस कंपनीने पाणलोटाच्या कामांना गंगापूर, बदनापूर व चिखली तालुक्यातील ६० गावांमध्ये पाणलोटाच्या कामांना गती देण्याचे ठरवले. सामाजिक दायित्व निधीअंतर्ग एलटीएफएस कंपनीने ही गावे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी निवडली आहेत, त्या गावांमध्येही धारूर तालुक्याचा पॅटर्न राबवून दुष्काळाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करत आहे.

सिमेंट नाला बंधारा बांधणे, जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती, डोंगरावरील सलग समतल चर, अनघड दगडी बांध, दगडी बांध बांधणे, तसेच मोठे बंधारे, नाल्यांचे खोलीकरण असे विविध पाणलोटाचे उपचार राबवण्यात येत आहेत. त्यामुळे पाण्याचा थेंब न थेंब अडवला आणि जिरवला जाईल याची काळजी घेण्यात येत आहे. विशेष म्हणजे ग्रामस्थांनी उत्साहाने श्रमदान करून मोलाची साथ या कामाला दिली आहे. जलवैभव प्रकल्पातून होणाऱ्या पाणलोटाच्या कामामुळे गावाला खऱ्या अर्थाने वैभव प्राप्त होणार असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.




### एलटीएफएसचे दायित्व मोलाचे



**डॉ.अनघा पाटील,** *(अध्यक्ष, दिलासा जनविकास प्रतिष्ठान)* - मराठवाड्यामध्ये दुष्काळी परिस्थितीत एलटीएफएस सारख्या कंपनीने औरंगाबाद, जालना व बुलढाणा या जिल्ह्यांतील प्रत्येकी २०-२० गावे ग्रामविकासासाठी निवडून मोठा सामाजिक पुढाकार घेतलेला आहे. जलवैभव प्रकल्पामध्ये पाण्याच्या नियोजनाबरोबरच शेतकऱ्यांचाही विचार करून त्यांच्या कृषी उत्पादन व उत्पन्न वाढीवर निरनिराळ्या प्रशिक्षण व उपक्रमातून जोर देण्यात आला आहे. मराठवाड्याला सातत्याने भेडसावत असलेली हवामान बदलाची समस्या व त्यामुळे दिवसेंदिवस कमी होणारे पावसाचे प्रमाण यामुळे शेतकऱ्यांना दिवसेंदिवस पीक उत्पादन घेणे अवघड होत चालले आहे. जलवैभव प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाणी वाचविण्याचे महत्त्व तसेच पाण्याचा कमीतकमी वापर करून जास्तीतजास्त उत्पादन कसे घेता येईल, यासाठीचे प्रशिक्षण देवून पीक उत्पादन वाढीसाठी दिलासा संस्था कार्य करीत आहे. यासाठी एलटीएफएस कंपनीने केलेले सहकार्य अनमोल असे ठरत आहे, ज्यातून निश्चितच ६० गावांतील पाण्याचा व शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागेल.

### नाविन्यपूर्ण प्रकल्पांना संधी



**संजीव उन्हाळे,** *(सचिव, दिलासा जनविकास प्रतिष्ठान)* - एलटीएफएसने सर्व कामे दुष्काळग्रस्त भागामध्ये सुरू केली. बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्याच्या बारा गावांमध्ये जलवैभव प्रकल्प राबविण्यात आला. त्यापैकी भायजळी हे गाव विकासाचा वस्तुपाठ होईल या पातळीपर्यंत गेले. पाण्याची पातळी वाढली, पिके बहरली आणि उपजीविकेचे साधन मिळाले. अर्थात, एलटीएफएसचे किरण कदम यांनी सातत्याने सर्वांना सातत्याने प्रेरणा दिली. अडचणी समजून घेतल्या आणि त्यातून मार्गही दाखविला. याशिवाय हवामान बदलानुकूल शेती समुदाय निर्मिती हा उपक्रम ६० गावामध्ये राबविण्यास सुरूवात केली. हे काम अतिशय नाविन्यपूर्णरित्या घडत आहे. पाणलोटाच्या सर्व उपचार पद्धती तर राबविण्यात येतच आहेत पण त्या जोडीला हवामान बदलानुकूल शेती लोकांना समजून सांगण्यासाठी शेवगा लागवड आणि घन-वनाचा प्रयोग करण्यात येत आहे. या प्रकल्पाला साठही गावांतून अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. एलटीएफएसने हे काम करण्याची आम्हाला संधी दिली त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

### विविध उपक्रमांतून ग्रामीण विकास



**वैशाली खाडिलकर,** *(उपाध्यक्ष, दिलासा जनविकास प्रतिष्ठान)* - औरंगाबाद, जालना व बुलढाणा जिल्ह्यातील अनुक्रमे गंगापूर, बदनापूर व चिखली तालुक्यातील प्रत्येकी २० गावांमध्ये जलवैभव प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत हवामान बदलानुकूल शेती समुदाय निर्मिती या उपक्रमाद्वारे हवामान बदलाचा जो काही परिणाम शेतीवर दिसून येत आहे, त्यावर मात करण्यासाठी एलटीएफएस कंपनीने पुढाकार घेवून खुप मोलाचे सहकार्य केले आहे. याअंतर्गत पर्जन्यमापन, शेवगा लागवड, घन-वन, शेतीशाळा इ. विविध उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. त्याजोडीला पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम. यातून विविध स्ट्रक्चर करून मातीची धूप थांबविण्यासोबतच पाणीसाठा वाढविणे हा उद्देश आहे. कारण पिकाची भरघोस वाढ व त्यापासून जास्तीतजास्त उत्पन्न घेण्यासाठी जमिनीतील पोषणतत्व जपण्याकरिता जमिनीची धूप थांबविणे गरजेचे आहे. या कार्यक्रमास शेतकऱ्यांमधूनही उत्स्फुर्त असा प्रतिसाद मिळत आहे, यामाध्यमातून दुष्काळी भागात शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. त्याबद्दल मी एलटीएफएस कंपनीचे आभार व्यक्त करते.

DILASA

# प्रकल्पाची पूर्वतयारी



**दिलासाने इतर प्रकल्पामध्ये केलेल्या कामांची पाहणी करताना एलटीएफएस कंपनीच्या सीएसआर प्रमुख श्रीमती.रिचा पंत व टीम लिडर श्री.किरण कदम**

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात एलटीएफएस कंपनीच्या अर्थसहाय्यातून जलवैभव प्रकल्पाचा यशस्वी अंमलबजावणी दिलासा जनविकास प्रतिष्ठान या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. धारुर मधील प्रकल्पाचे यश पाहता एलटीएफएस कंपनीने औरंगाबाद, जालना व बुलढाणा या तीन जिल्ह्यातील अनुक्रमे गंगापूर, बदनापूर व चिखली या तालुक्यांमध्येही हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला. अंमलबजावणी संस्था म्हणून दिलासालाच संधी देण्यात आली.प्रत्येकी तीन तालुक्यात प्रत्येकी २० गावे अशा साठ गावांमध्ये हा प्रकल्प राबवण्याचे ठरले. प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यापूर्वी दिलासा संस्थेने यापूर्वी सामाजिक दायित्व निधीतून इतर कंपन्यांबरोबर केलेल्या कामाचा आढावा एलटीएफएस कंपनीच्या प्रतिनिधीनी दि.११ जून २०१९ रोजी घेतला त्यानंतरच प्रत्यक्ष प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु झाली. दिवसेंदिवस हवामानात होणारे बदल आणि त्याचा शेती तसेच एकंदरीत ग्रामीण जिवनावर होणारे दूरगामी परिणाम पाहता फक्त पाणी या एकाच विषया धरुन काम करण्यापेक्षा हवामान अनुकूल शेती समुदाय कसा निर्माण होईल आणि त्यासाठी काय काय उपाययोजना करता येतील यावर कंपनीचे प्रतिनिधी आणि दिलासा संस्थेच्या पदाधिकाऱ्यात चर्चा झाली आणि विशिष्ट उपाययोजना राबवण्याचे ठरले. हवामान अनुकूल शेती समुदाय निर्मिती या नावाखाली तिनही जिल्ह्यांच्या ६० गावांमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी सध्या प्रगतीपथावर आहे.

# परिवर्तनाची पहाट

एलटीएफएस कंपनी ही एक नॉन-बँकिंग फायनान्शीयल कंपनी आहे. जिचे मुख्यालय मुंबई येथे असून त्यांच्या भारतभर शाखा कार्यरत आहेत. एलटीएफएस कंपनी दुचाकी, ट्रॅक्टर व सूक्ष्म कर्जपुरवठा करत असते. ही सर्व कामे करीत असताना सामाजिक बांधिलकी म्हणून महाराष्ट्रातील मराठवाड्यामध्ये जलवैभव प्रकल्प राबवित आहे. त्याअंतर्गत धारूर, अंबेजागाई येथेही पाणलोट कार्यक्रम तसेच औरंगाबाद, जालना, बुलढाणा येथे हवामान बदल अनुकूल शेती समुदाय निर्मिती हा शेतकऱ्यांसाठी जलवैभव प्रकल्पा अंतर्गत हा कार्यक्रम राबवित आहे. एलटीएफएसने धारूर सारख्या दुष्काळी भागात परिवर्तनाची नवी पहाट जागवली आहे. आतातर साठ गावांमध्ये नाविण्यपूर्ण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. शेवटी ग्रामीण भागात परिवर्तन घडविण्यासाठी कंपनीने हे प्रयत्न चालविले आहेत.

# जलवैभव प्रकल्प



## विशेष कार्यशाळेचे आयोजन

एलटीएफएस कंपनीतर्फे राबवण्यात येणाऱ्या गंगापूर, चिखली, बदनापूर येथील जलवैभव प्रकल्पाची ओळख दिलासा कर्मचारी आणि या प्रकल्पात काम करत असलेल्या तिन्ही जिल्ह्यातील प्रतिनिधीला व्हावी यासाठी विशेष एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिलासाच्या औरंगाबादस्थित मुख्य कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी प्रकत्पाअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमाची माहिती देण्यात आली. प्रकल्पात समाविष्ट असलेल्या सर्व गोष्टींची चर्चा करून विविध प्रश्नांचे निराकरण करण्यात आले. प्रत्येक उपक्रमाची विश्लेषनात्मक चर्चा करण्यात आली. तसेच सर्व टीम मेंबरच्या कामांच्या जबाबदारीची ओळख करून देण्यात आली. गावपातळीवरील सर्व कामे ही सहज व लवकरात लवकर सुरू व्हावीत यासाठी कार्यपध्दती समजावून कामाची जबाबदारी सोपवण्यात आली.

# कृषीदूत: प्रकल्प अंमलबजावणीचा कणा

जिल्हे त्यातील तीन तालुक्यातील ६० गावे प्रकल्पात सहभागी करण्यात आल्याने कामाचा आवाका खूप मोठा होता. त्यासाठी सक्षम कार्यपध्दती आणि गावपातळीवरील सक्षम कार्यकर्ते यांची गरज होती. एलटीएफएस कंपनीच्या प्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली गावपातळीवरील कार्यकर्ते निवडून त्यांची कृषीदूत म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामस्थ, शेतकऱ्यापर्यंत एलटीएफएस व दिलासाला पोहचवण्याचे काम हे कृषीदूत करत आहेत. तथापी या कृषीदूतांची निवड करताना त्यांना विशेष परिक्षेतून जावे लागले. त्याचे गावाविषयीचे ज्ञान, ग्रामीण विकासाबाबतची समज, कृषीविषयक त्यांना असलेली माहिती या परिक्षेतून तपासण्यात आली आणि प्रत्यक्ष मुलाखतीनंतरच त्यांची कृषीदूत म्हणून निवड करण्यात आली आहे. एलटीएफएस कंपनीच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या या प्रकल्पाची काटेकोर अंमलबजावणी होऊन ग्रामविकासाचा खरा उद्देश साध्य होण्यास मदत होणार आहे.





# शेवगा लागवडीची उत्पन्नक्रांती



जलवैभव अंतर्गत विविध उपक्रम राबवताना शेतकऱ्यांच्या उत्पन्नात कशी वाढ होईल यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासाठी पारंपारिक पिकांबरोबरच कमी पाण्यात, कमी खर्चात शाश्वत उत्पन्न मिळवून देणाऱ्या शेवगा लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यात आले. त्यासाठी पध्दतशिरपणे जनजागृती मोहिम घेण्यात आली. यावेळी शेवगा लागवडीचे आर्थिक, आरोग्याच्या दृष्टीने आणि शेतजमीनीचा पोत सुधारण्यासाठी कोणते फायदे आहेत याची माहिती तज्ज्ञांमार्फत देण्यात आली. शेवगाला बाजारात असलेला चांगला भाव, आणि त्याच बरोबर त्याचा पशुखाद्य म्हणून होणारा उपयोग, त्याच्या लागवडीमुळे जमिनीचा वाढणारा कस, पाने, बिया, शेंगा व खोड या सर्वच भागांच्या विक्रीतून मिळणारा आर्थिक लाभ याचे महत्व शेतकऱ्यांना पटले. शेवगा लागवड कशी करावी याचे रितीसर प्रशिक्षण देऊन लाभार्थी शेतकऱ्यांना मागणीनुसार रोपांचा पुरवठा करण्यात आला आहे. लागवडीनंतरचे तंत्रज्ञानही कृषीदूतांमार्फत पुरवण्यात येत आहे. शेवगा लागवड उपक्रमाला शेतकऱ्यांनीही उदंड प्रतिसाद दिला. एलटीएफएस व दिलासा संस्थेने शेवग्याची मागणी तत्परतेने पुरवल्याने शेतकऱ्यांनी कंपनीचे आभार मानले आहेत.

# पावसाच्या पाण्याचा ताळेबंद







दिवसेंदिवस कमी होणारे पर्जन्यमान आणि त्यामुळे संकटात असलेली शेती यामुळे शेतकऱ्यांच्या जिवनावर मोठा परिणाम झाला आहे. जलवैभव प्रकल्पाअंतर्गत याविषयी सखोल चिंतन करण्यात आले. गावात पडणारा पाऊस प्रत्येक ग्रामस्थाला समजला पाहिजे आणि त्यानुसार त्याने शेतीचे नियोजन केले पाहिजे यासाठी या प्रकल्पाअंतर्गत पावसाचा ताळेबंद कसा ठेवायचा याचे प्रशिक्षण गावकऱ्यांना देण्यात आले. प्रत्येक गावात पडणारा पाऊस मोजण्यासाठी पर्जन्यमापक यंत्र वाटप करण्यात आले.गावकऱ्यांनी स्वत: पाऊस कसा मोजावा, पाण्याचा ताळेबंद कसा ठेवावा याचे प्रशिक्षण दिलासा संस्थेने व्हिडिओ चित्रफिती व प्रात्यक्षिकाद्वारे दिले आणि प्रत्यक्ष त्याचे प्रात्यक्षिक करुन घेतले. आज गावात पडणारा पाऊस ग्रामस्थ स्वत: मोजत आहेत आणि त्यानुसार शेतीचे नियोजन करत आहेत.

# घनवन उपक्रमातून पर्यावरण संरक्षण

## मियावाकी या जपानी तंत्राचा प्रभावी वापर



वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा नाश होत आहे. त्यामुळे कमी होणारे पाऊसमान, वाढलेले तापमान आणि दूषित हवेला तोंड देण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. जपानमध्ये या संकटावर मियावाकी वर अर्थात घनवन हा प्रकल्प राबवण्यात येतो .त्याचे चांगले परिणाम जगासमोर आल्यानंतर जगभरात त्याचा प्रसार सुरु झाला. गंगापूर, बदनापूर व चिखली येथील काही गावांमध्ये प्रातिनिधिक स्वरुपात घनवन उपक्रम राबविण्यात येत आहे. या प्रकल्पात विविध प्रकारची देशी झाडे कमी जागेत लावून एक घनदाट जंगल तयार करण्यात येते.त्यामुळे वातावरणीय संतुलन तर राखल्या जातेच तसेच तापमान २ अंश डिग्री सेल्सीयस इतके कमी होते. ऑक्सिजनचा एक मोठा स्त्रोत तयार होतो. सर्वात महत्वाचे म्हणजे जैवविविधता टिकवण्यास घनवनांची मोठी मदत होते. एलटीएफएस कंपनी व दिलासासंस्थेमार्फत अशी घनवने तयार करुन जैवविविधता टिकवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# शेती शाळेतून जनजागृती

## शेतीशाळा हे उत्पन्न वाढविण्याचे तसेच किडी-अळींचा प्रादुर्भाव थांबविण्यासाठी योग्य मॉडेल

पर्यावरणात बदल, कमी पर्जन्यमान याचा विपरीत परिणाम मागील १० ते १५ वर्षापासून वाढले आहेत. विशेषतः महत्त्वाचे पीक असलेल्या कापसावर त्याचे दूरगामी परिणाम झाले त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडून त्याला शेती करणेच अवघड होऊन बसले. कापसाचे उत्पादन वाढावे यासाठी दिवसोंदिवस रासायनिक खते, किटकनाशके यांचा वापर वाढला त्यामुळे उत्पादन खर्च आवाक्याबाहेर गेला. त्यामानाने कापसाचे उत्पादन घटले. हवामानाशी जुळवून घेत आणि कमी उत्पादन खर्चात कापसाची लागवड करण्याचे तंत्रज्ञान देण्याची गरज होती. जलवैभव प्रकल्पाअंतर्गत शेतीशाळेच्या माध्यमातून कमी उत्पादन खर्चात गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादन कसे करता येईल याचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. गावातून एकाची प्रातनिधिक शेतकरीम्हणून निवड शेतीशाळेसाठी लाभार्थी म्हणून करण्यात आली. यावेळी गावातील इतर शेतकऱ्यांनाही बोलावण्यात आले. कापसाच्या लागवडीपासून ते वेचणीपर्यंत सर्व मार्गदर्शन शेतीशाळेमार्फत देण्यात येत आहे.एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी जमिनीच्या नांगरणीपासून ते सापळा पीक कसे लावावे, पेरणीच्यावेळी दोन झाडातील अंतर, जिवामृत, गांडूळखत, निंबोळी अर्क याच्यामाध्यमातून किड व रोगव्यवस्थापन कसे करावे याची प्रात्यक्षिके शेतीशाळेत घेण्यात येत आहेत. केवळ पिकाचीच नाही तर शेतकऱ्यानेही त्याच्या आरोग्याची काळजी फवारणी करताना कशी काळजी घ्यावी, त्यासाठी कोणती साधने वापरावी, याचे मार्गदर्शन करण्यात येत आहे. याही वर्षी पावसाचे प्रमाण कमी आहे अशा परिस्थितीतही कापसासारखे पिक कमी पावसात कसे जगवता येईल याची माहिती शेतीशाळेतून मिळत असल्याने जलवैभव प्रकल्पातील ६० गावातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.










# एलटीएफएसने केली जलवैभवची क्षेत्रपाहणी

एलटीएफएस कंपनी मुंबई येथील श्री.किरण कदम व विपाशा ठाकूर यांनी मराठवाड्यातील सुरू असलेल्या जलवैभव या (हवामान अनुकूल शेती समुदाय निर्मिती) प्रकल्पाचे काम जाणून घेण्यासाठी क्षेत्र पाहणी केली. औरंगाबाद येथील गंगापूर तालुक्यातील गाजगाव, खादगाव व देवळी येथील सिमेंट नाला बंधारा दुरूस्तीकरण आणि गावातील लोकांशी चर्चा करून तेथील ग्रामस्थांच्या समस्या समजून घेतल्या. हवामान बदलाचा परिणाम कमी करण्यासाठी सुरू असलेल्या घन-वन या प्रकल्पासही भेट दिली व त्यातील परिपूर्ण माहिती समजून घेतली. जालना येथील बदनापूर तालुक्यातील रोषणगाव, केळीगव्हान, राळा, अन्वी, कंडारी बु., उजैनपूरी व वाल्हा गावातील खोलीकरणाची कामे, शेतकऱ्यांसाठी सुरू असलेल्या शेतीशाळेस भेट दिली व तेथील अमृतमिट्टी, पिवळे सापळे, फेरोमेन ट्रॅप, इ. विषयी ग्रामस्थांसोबत चर्चा करून त्यांच्या होणाऱ्या फायद्यांविषयी माहिती करून घेतली व मार्गदर्शनही त्यांनी केले. तसेच सिमेंट नाला बांध दुरूस्ती, सलग समतल चर, अनघड दगडी बांध, शेवगा लागवड, इ. कामांना भेटी दिल्या. तसेच दिलासा ऑफिसमधील जलवैभवच्या टीमला मार्गदर्शन व सूचना केल्या.

जलसमृद्ध गाव साकारण्यासाठी एक पाऊल




क्षेत्र पाहणी दरम्यानचे काही क्षणचित्रे.

Scan QR Code
to visit our website

Follow us

facebook.com/dilasajp twitter.com/dilasa_ngo

linkedin.com/dilasa-janvikas-pratishthan

https://www.youtube.com/channel/UC8h25V8359jPik_ax7GH7EQ/videos?view_as=subscriber

जलवैभव वार्ता हे पत्रक दिलासा जनविकास प्रतिष्ठानकरिता श्री.संजीव उन्हाळे यांनी दिलासा ॲग्रो प्रोसेसर्स ॲण्ड पब्लिशर्स प्रा.लि.द्वारे बी-३, सुदर्शन पार्क, वेदांतनगर, औरंगाबाद येथे मुद्रीत व प्रकाशित केले आहे. वृत्त संकलन - प्रविण निकम, मांडणी व सजावट - दत्तात्रय शेटे

## मनोगत



### धारूरच्या प्रकल्पातून प्रेरणा

**मोहसीन अहमद,** *(प्रकल्प उप-व्यवस्थापक)* - एलटीएफएस मार्फत धारूरमधील १२ गावांमध्ये राबवण्यात आलेल्या जलवैभव प्रकल्पात मी सक्रीय सहभागी होतो. त्यावेळी केलेले प्रशिक्षण, कार्यक्रम व पाणलोटाची विविध कामे मला प्रेरणा देवून जातात. त्यावेळी भायजळी, चोरंबा, अरणवाडी व इतर गावांमध्ये जलवैभव प्रकल्पाच्या कामांमुळे भरपूर पाणीसाठा झाल्याने या गावांची भूजलपातळी वाढली आणि त्याचे दृश्य परिणाम दिसून आले. आता नवीन सुरू असलेल्या हवामान बदल प्रकल्पातही मी समाविष्ट आहे. या दोन्ही प्रकल्पांमध्ये मला अंमलबजावणी करण्याची व शिकण्याची जी संधी मिळत आहे त्याबाबत मी एलटीएफएस कंपनीचा आभारी आहे.



### गरजांना अनुरूप असलेला 'जलवैभव'

**प्रदीप चोबे,** *(कृषि अधिकारी)* - जलवैभव हा अत्यंत सुनियोजीत आणि शेतकऱ्यांच्या गरजांना अनुरूप असलेला प्रकल्प आहे. पावसाच्या पाण्याचे पाणलोटाद्वारे अचुक जास्तीत जास्त कृषि उत्पन्न मिळवणे ही काळाची गरज आहे. या दोन्ही बाबी जलवैभव या प्रकल्पात पुर्ण होतात. या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांवर हवामान बदलाचा होणारा परिणाम कमी कसा करता येईल याचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे होते. शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळण्यासाठी दिलासा संस्थेकडून मी वेळोवेळी स्वत: शेतावर प्रत्यक्षात जाऊन मार्गदर्शन, सूचना केल्या. शेतीमध्ये अंतरपिके घेण्याची शास्त्रीय पद्धत समजावून अंतरपिकांतील अंतर, औषधी व निगा या बाबत शेतकऱ्यांना सूचना दिल्या. या सुचनांचे शेतकऱ्यांनी अनुकरन करून शेतीमध्ये शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला त्यामुळे प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांची पिके इतर शेतकऱ्यांच्या पिकांच्या तुलनेत खरोखरच चांगली आली.



### खऱ्या अर्थाने जलजागृती झाली

**उदय डोईफोडे,** *(पाणलोट विकास तज्ज्ञ)* - एलटीएफएस व दिलासा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या जलवैभव प्रकल्पाअंतर्गत मला साधन व्यक्ती म्हणून काम करण्याची संधी मिळाली त्या अनुषंगाने चिखली तालुक्यातील वीस गावांमध्ये जलजागृती अभियान याकरिता स्थानिक गावकऱ्यांशी शेतकऱ्यांशी संवाद साधला गेला. या अभियानामुळे लोकांमध्ये पाण्याचे नियोजन पर्जन्यमापकाद्वारे पाणी कसे मोजायचे, पाण्याचा ताळेबंद कसा करावा, कुठे किती पाणी वापरावे इ. सर्व मार्गदर्शन सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केले गेले. कार्यक्रम राबविल्यानंतर शेतकऱ्यांनीसुध्दा या कार्यक्रमात मिळालेल्या माहितीच्या आधारे भविष्यात उपयोग करण्याविषयी निर्धार व्यक्त केल्याचे सांगितले. त्यामुळे एलटीएफएस व दिलासा जनविकास प्रतिष्ठान औरंगाबाद यांच्या जलवैभव प्रकल्प यशस्वी होण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण भासत नाही व त्यांना पुढील कामासाठी शुभेच्छा व्यक्त करतो.



### रोशनगावात विकासाची गंगा

**बद्रीनाथ भानुदास खरात, सरपंच,** *(रोशनगाव, ता.बदनापूर, जि.जालना)* - प्रथमत: एलटीएफएस व दिलासाने माझ्या गावाची निवड केल्याबद्दल आभार मानतो. ''जल है तो कल है'' या उक्तीप्रमाणे जलवैभव प्रकल्पाचे काम सुरु आहे. एलटीएफएस कंपनी व दिलासा संस्थेच्या माध्यमातून सिमेंट बंधारा, खोलीकरण, गाळ काढणे, कृषीविषयक प्रशिक्षणे अशी मोलाची कामे गावात सुरु आहेत.सरपंच या नात्याने मी गावकऱ्यांचे मत जाणून घेतले त्यावेळी त्यांनीही या कामाबाबत आनंद व्यक्त केला.जसंधारण ही काळाची गरज आहे. हे काम एलटीएफएस कंपनी व दिलासा संस्था करीत आहे, त्यामुळे गावात नक्कीच विकासाची गंगा येईल.



### नवी दिशा मिळाली

**सागर महाले** *(कृषीदूत)* - जलवैभव प्रकल्पांतर्गत उजैनपूरी हे माझे गावही दत्तक घेतले आहे. प्रकल्पाच्या निमित्ताने दिलासा संस्थेच्या प्रतिनिधींशी ओळख झाली. प्रकल्पाअंतर्गत कृषीदूतांची नेमणूक परिक्षेव्दारे उमेदवाराची निवड करण्यात येणार असे कळल्यानंतर मीही परिक्षा दिली. माझी निवड झाली तेव्हापासून मी वेगवेगळी प्रशिक्षणे व पाणलोट कार्यक्रमाव्दारे मला प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे आज माझ्या ज्ञानात भर पडली आहे तसेच गावपातळीवर काम करणे सोपे जात आहे. गावविकासाच्या कामात कृषीदूताच्या माध्यमातून आणि एलटीएफस कंपनीमुळे मला सहभागी होता आले  याचा आनंद तर वाटतोच पण माझ्या जिवनालाही नवी दिशा मिळाली आहे.



### जलवैभवमुळे शेतीला मिळाले नवजीवन

**विष्णु अंबादास नेमाणे** *(एफएफएस लाभार्थी)* - जलवैभव प्रकल्पात माझी प्रातनिधिक शेतकरी म्हणून निवड झाल्यापासून माझ्या शेतात प्रात्यक्षिके राबवण्यात येत आहेत तसेच, नवनविन माहिती, प्रशिक्षणे यामुळे शेतीविषयक ज्ञानात भर पडली आहे. पूर्वी कृषीसेवा केंद्र चालकाच्या सल्ल्याने मी शेती करत असे आता मात्र मला वेळोवेळी कृषी सल्ला आणि मार्गदर्शन मिळत असल्याने शेतीत त्याचा फायदा दिसू लागला आहे. कापसावर यावर्षी अळीचा प्रादुर्भाव कमी आहे तसेच पिकेही पाऊस नसताना जोर धरू लागली आहे. त्यामुळे मी एलटीएफएस व दिलासा संस्थेचे आभार मानतो.